आदिवासी गोवारी शहिद स्मृती शेळी व पशुपालन सहकारी संस्था मर्यादित, नागपूर यांच्या नांवे असलेली जमीन पशुसंवर्धन खात्याच्या नांवे हस्तांतरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१५/प्र.क्र.४२३/पदुम-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
५ वा मजला विस्तार, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २८ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्रमांक एमएमडीसी- २००५/२२६५/प्र.क्र.२४९/पदुम-३, दिनांक १२.०७.२०१०.
२) आयुक्त, पशुसंवर्धन कार्यालयाचे पत्र क्रमांक :- एमडीएस/१८/८४६ /भाग-३/१५०५-०७/ २०१५ /पसं-१३, दिनांक २४.०४.२०१५.

प्रस्तावना :-

आदिवासी गोवारी शहिद स्मृती शेळी व पशुपालन सहकारी संस्था मर्यादित, नागपूर ही संस्था डबघाईस आल्यामुळे निष्कासित करण्याची कारवाई करण्याचे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ यांनी रिट याचिका क्रमांक ४११८/२००८ मध्ये दिनांक ०५.११.२००९ रोजी दिले होते. त्यानुसार दिनांक ०२.०६.२०१० रोजी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक १२.०७.२०१० च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली व सदर प्रकल्प हा संस्थेने तेथील कर्मचाऱ्यांसह पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येवून महामंडळामार्फत चालविण्याचे ठरले आहे. मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका दिनांक १९.१०.२०१० च्या आदेशान्वये निकालात काढली. आता सदर संस्थेची जमीन शासनाच्या नांवे वर्ग करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

शासन निर्णय :-

आदिवासी गोवारी शहिद स्मृती शेळी व पशुपालन सहकारी संस्था मर्यादित, नागपूर या संस्थेच्या नांवे असलेली एकूण ४२.०७ हेक्टर एवढी जमीन शासनाकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. ही जमीन आयुक्त,पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नांवे जमिनीच्या दस्तऐवजांवर नोंदविण्यात यावी. सदर जमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	जमिनीचा तपशील	क्षेत्र
१.	मौजे बोंद्री, ता. रामटेक येथील पटवारी हलका क्र.२४ नुसार खसरा क्र. ४९, ५०, ५२, ५३, ५४, ५५, ५६/१, ५६/२, ५७, ५९, ६०, १४८/१, १४८/२, १४८/३, १४९,	२२.३० हेक्टर
२.	मौजे लोहारा (रिठी), ता. पारशिवनी येथील पटवारी हलका क्र.४ नुसार खसरा क्र. ६, ७, ९, १०,११, २५, २६, २७, २९, ३०, ४०, ९३, ९४/१	१९.७७ हेक्टर
	एकूण	**४२.०७ हेक्टर**

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१६०१२८१६५८३६६२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shashank Madhav Sathe

Digitally signed by Shashank Madhav Sathe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, cn=Shashank Madhav Sathe
Date: 2016.01.28 16:58:58 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव.
३) महालेखापाल १/२, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४) प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
५) आयुक्त पशुसंवर्धन,पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
६) जिल्हाधिकारी, नागपूर.
७) व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे.
८) प्रादेशिक पशुसंवर्धन उपायुक्त, नागपूर.
९) उपविभागीय अधिकारी (महसूल) रामटेक, जिल्हा नागपूर.
१०) तहसिलदार, रामटेक, जिल्हा नागपूर
११) तहसिलदार, पारशिवनी, जिल्हा नागपूर
१२) आदिवासी गोवारी शहिद स्मृती शेळी व पशुपालन सहकारी संस्था मर्यादित, गोपाळनगर, पो. राणाप्रताप नगर, नागपूर-४४० ०२२.
१३) निवडनस्ती, कार्या.पदुम- ३